वाचले:- १) श्रीम.शिंदे माया रंगनाथ ,सहाय्यक शिक्षिका यांचा दिनांक २०/०८/२०१६ रोजीचा अर्ज

२) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय वाकड यांचे दि.२५/०८/२०१६ रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम ६६

४) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.

५) महाराष्ट्र शासन शिक्षण सेवा योजन विभाग निर्णय क्र पीईएन १०७८/११०५/२०६५/ माशि- ६ दि.९/९/८८

६) मा.लेखाधिकारी यांचेकडील दिनांक २९/०९/२०१६ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र

७) मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र प्रशा/२/कावि/५४६/२०१६ दि ७/१०/२०१६

८) मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दिनांक४ /११ /२०१६ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/१३८०/२०१६
दि. ४ / ११ /२०१६

विषय – <u>श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका</u>
यांचे स्वेच्छानिवृत्तीबाबत (संगणक क्रं.५७५२)

<u>आदेश,</u>

श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका हया पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा.शिक्षिका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत काम करीत आहेत.दिनांक २०/०८/२०१६ चे अर्जान्वये त्यांनी घरगुती अडचणीमुळे दिनांक २१/११/२०१६ पासुन स्वेच्छानिवृत्ती देणेची मागणी केली आहे.

श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका म.न.पा मध्ये दिनांक ०८/०२/१९९१ रोजी सहाय्यक शिक्षिका अभिनामाच्या पदावर रुजु झाले आहेत. त्यांची सेवानोंद पुस्तकातील नोंदीनूसार जन्मतारीख २६/०४/१९६३ अशी आहे. श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका यांना सेवामातत्य देणेत आलेले नाही. त्यांची स्वेच्छानिवृत्तीच्या तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक २१/११/२०१६ अखेर एकुण सेवा २५ वर्ष ०८ महिने २० दिवस पुर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ मध्ये शासकीय कर्मचा-याची २० वर्ष इतकी निवृत्तीपात्र सेवा झाल्यावर कर्मचा-यास केव्हाही सेवानिवृत्त होता येते मात्र ज्या तारखेस निवृत्त व्हावयाचे असेल त्याच्या ३ महिने अगोदर कर्मचा-याचे नियुक्ती प्राधिका-यास नोटीस दिली पाहिजे अशी तरतुद आहे. त्यानुसार त्यांनी ३ महिने अगोदर उपरोक्त १ अन्वये कळविले आहे.

श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका, यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैयकीय अग्रीम यांचेकडील कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी

Scanned with CamScanner

अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.६ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचे कडील दि.२८/०९/२०१६ रोजीचा थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केलेला आहे. तसेच भविष्यात लेखापरिक्षण आक्षेप निघाल्यास संबंधितांचे पेन्शन मधुन वसुल करणेत येईल. मुख्याध्यापक, माध्यमिक विदयालय वाकड यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका सेवानिवृत्ती बावत शिफारस केलेली आहे.

सबब, मी **शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग** पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८ , उपरोक्त वाचले क्र ३ व ५ मधील महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमातील उक्त तरतुद व शासन निर्णय अन्वये श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका यांना महापालिका सेवेतुन दिनांक २१/११/२०१६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर स्वेच्छानिवृत्तीसाठी या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
२१/११/१६

प्र.शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम.शिंदे माया रंगनाथ, सहाय्यक शिक्षिका
माध्यमिक विद्यालय वाकड

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय वाकड

२/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner